दै. लोकमत दि. 10/01/2023.

## पोलिस स्थापना दिनी मिळाले मोबाइल परत



हरवलेल्या २७ मोबाइलचा पोलिसांनी शोध लावला असून, त्यातील १४ मोबाइल मूळ मालकांना सोमवारी परत करण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोलिस उपाधीक्षक चंद्रसेन देशमुख, निरीक्षक जगदीश भंडरवार, सायबरचे निरीक्षक उबाळे आदींची उपस्थिती होती.

सकाळ दि. 10/01/2023.

# हरवलेले २७ मोबाईल दिले परत

## पोलिस स्थापना दिनानिमित्त कार्यक्रम

नांदेड, ता. ९ (बातमीदार) : पोलिस स्थापना दिनाचे (रेझींग डे) औचित्य साधून पोलिस विभागाच्या वतीने हस्तगत करण्यात आलेले २७ मोबाईल संबधितांना सोमवारी (ता. नऊ) पोलिस अधीक्षक कार्यालयात परत देण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह पोलिस अधिकारी उपस्थित होते.



**नांदेड :** पोलिस स्थापना दिनाचे (रेझींग डे) औचित्य साधून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संबंधितांना देण्यात आले.

सायबर विभागाचे पोलिस निरीक्षक श्री. उबाळे, सहायक पोलिस निरीक्षक श्री. थोरवे, फौजदार दळवी, अंमलदार राजू सिटीकर, दीपक ओढणे यांनी २७ मोबाईल क्रमांकाची माहिती तांत्रिक पद्धतीने हस्तगत केली. त्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांनी या संदर्भातील माहित घेऊन शोधून काढण्याची सूचना दिल्या.

वजिराबाद गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलिस अंमलदार गजानन किडे, नायक शरदचंद्र नंदे, मनोज परदेशी, संतोष बेलुरोड, व्यंकट गंगुलवार, बालाजी कदम, रमेश सुर्यवंशी, इम्रान शेख आदींनी मोबाईलधारकांचा शोध घेऊन त्यांच्याकडील २७ मोबाईल हस्तगत केले. सदरील मोबाईल पोलिस स्थापना दिनाचे औचित्य साधून संबंधित मोबाईलधारकांना देण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलिस उपअधीक्षक चंद्रसेन देशमुख यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.